चक्रीवादळ निवारा केंद्राचे व्यवस्थापन व देखभाल व दुरूस्ती समितीची स्थापना आणि नोंदणी करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन)

शासन निर्णय क्रमांक :- आव्यप्र-२०१७/प्र.क्र.२६ /आव्यप्र-१

मंत्रालय, मुंबई ४ ००० ०३२.

दिनांक :- २२.०८.२०१९

प्रस्तावना :-

जागतिक बँक सहाय्यित राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्प राज्यात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत समुद्रकिनारपट्टीलगतच्या ४ जिल्ह्यांमध्ये खालीलप्रमाणे ११ ठिकाणी बहुउद्देशीय चक्रीवादळ निवारा केंद्र बांधण्यात येणार आहे.

१. सिंधूदूर्ग- काळेथर, आचरा, जामसंडे व विजयदुर्ग.
२. रत्नागिरी- सैतवडे, हर्णे व दाभोळ.
३. रायगड- बोर्ली व दिघी.
४. पालघर- एडवण व उसरणी.

सदर निवारा केंद्रात आपत्तीदरम्यान स्थानिक आपत्तीग्रस्त लोकांना अस्थायी निवारा प्राप्त होईल. सदर केंद्राचे दैनंदिन व्यवस्थापन व देखभाल दुरुस्तीचे काम स्थानिक जनतेव्दारे होणार आहे. यासाठी प्रत्येक बहुउद्देशीय चक्रीवादळ निवारा केंद्राच्या व्यवस्थापन आणि देखभाल दुरूस्तीसाठी समितीची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पांतर्गत बांधण्यात येणाऱ्या बहुउद्देशीय चक्रीवादळ निवारा केंद्राच्या व्यवस्थापन देखभाल दुरुस्तीसाठी व्यवस्थापन व देखभाल दुरूस्ती समितीची खालीलप्रमाणे स्थापना करण्यास आणि या समितीची नोंदणी करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सर्कल आफिसर (महसूल)	अध्यक्ष
सरपंच (ग्रामपंचायत)/ नगराध्यक्ष (नगरपालिका)	उपाध्यक्ष
ग्रामसेवक	सचिव
तलाठी	कोषाध्यक्ष
ग्रामस्थ-१	सदस्य
ग्रामस्थ-२	सदस्य
ग्रामस्थ-३	सदस्य
ग्रामस्थ-४	सदस्य
ग्रामस्थ-५	सदस्य
ग्रामस्थ-६	सदस्य
ग्रामस्थ-७	सदस्य

१. या समितीचे गठण व नोंदणी सोसायटी रजिस्ट्रेशन अ‍ॅक्ट - १८६० अंतर्गत करण्यात यावी.
२. समितीचा कार्यकाळ जास्तीत जास्त ५ वर्षाचा असेल.
३. सदर निवारा केंद्रे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली असतील.
४. ग्रामसभेमध्ये ग्रामस्थांना ७ सदस्य निवडण्याचा अधिकार आहे. ७ सदस्यामध्ये ३ महिला असाव्यात. सदर ७ सदस्य विविध प्रकारच्या विषयांवर शासकीय व अशासकीय सेवेत काम केलेले नागरिक असावेत. या सदस्यामध्ये मुख्याध्यापक/ शिक्षक, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदेसाठी निवडलेले लोकप्रतिनिधी, सेवानिवृत्त पोलीस/ सैनिक/ सरकारी कर्मचारी, अधिकारी, गैरसरकारी संस्थाचे प्रतिनिधी व महिला संघटनांचे प्रतिनिधी निवडता येतील. वरील समितीमध्ये जास्तीत जास्त ११ सदस्य निवडता येतील.
५. चक्रीवादळ निवारा केंद्राचे दैनंदिन व्यवस्थापन, देखभाल व दुरूस्ती करणे, आर्थिक व्यवस्थापन करणे, लेखे तयार करणे, आपत्तीच्या वेळेत आपत्तीग्रस्त लोकांना अस्थायी निवासाची व्यवस्था करणे, या निवारा केंद्राचा स्थानिक जनतेच्या आर्थिक सामाजिक विकासाकरीता उपयोग करुन असामाजिक कामासाठी इमारतीचा वापर होवू न देणे याची जबाबदारी या समितीवर असेल.
६. सदर केंद्रात वरील समिती सोबतच संबंधित गावातील २०-२५ तरूणांचे शोध व बचाव तसेच प्रथमोपचार कार्यदल संबंधित गावाने तयार करुन त्यांना आवश्यक साहित्य उपलब्ध करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१६१५५१४२४४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRIRANG SHRIPATI GHOLAP

Digitally signed by SHRIRANG SHRIPATI GHOLAP
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9a2bc3b45be4b89f7c46c4474cf90b8a3c477e34c064494b04238ca50ee43db6, postalCode=400032, street=1ST FLOOR MAIN ROAD, MANTRALAYA, ou=REVENUE AND FOREST DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHRIRANG SHRIPATI GHOLAP
Date: 2019.09.16 16:02:50 +05'30'

(श्रीरंग घोलप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. जिल्हाधिकारी सिंधूदूर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर.
२. सार्वजनिक बांधकाम विभाग (पत्तन अभियंता) ठाणे, रत्नागिरी व सिंधूदूर्ग विभाग.